निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* मुख्य संपादक * सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक * लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper : www. attachexpress.in
Post Regd.No. LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक २७६ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * शनिवार दि.०७ फेब्रुवारी २०२६ | * पाने-४

## आज १२ झेडपी, १२५ पंचायत समित्यांसाठी मतदान; २१९३ जागा, ७४३८ उमेदवार

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी उद्या (ता. ७) मतदान होत असून जिल्हा परिषदेच्या ७३१; तर आणि पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. एकूण ७ हजार ४३८ इतके उमेदवार निवडणूक रिंगणात असून सर्व मिळून एकूण २ कोटी ८ लाख २० हजार ७०२ इतकी मतदार संख्या आहे. संपूर्ण मतदान प्रक्रियेसाठी पुरेशा पोलिस बंदोबस्ताचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा १३ जानेवारी २०२६ रोजी केली होती. त्यानुसार ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार होते; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाल्यानंतर मतदानाच्या तारखेत बदल करण्यात आला. त्यानुसार आता उद्या (ता. ७) सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. मतमोजणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल. त्यानंतर आचारसंहिता संपुष्टात येईल.

सर्व बारा जिल्हा परिषदांच्या एकूण ७३१ जागा असून, त्यातील ३६९ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी ८३, अनुसूचित जमातींसाठी २५ आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी १९१ जागा आरक्षित आहेत. जिल्हा परिषदांच्या या सर्व जागांसाठी एकूण २ हजार ६२४ उमेदवार निवडणूक लढवित आहेत.

सर्व १२५ पंचायत समित्या मिळून एकूण १ हजार ४६२ जागा असून, त्यातील ७३१ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी १६६, अनुसूचित जमातींसाठी ३८ आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३४२ जागा आरक्षित आहेत. पंचायत समित्यांच्या या सर्व जागांसाठी एकूण ४ हजार ८१४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

निवडणूक होत असलेल्या जिल्हा परिषदांच्या व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या एकूण मतदारांमध्ये १ कोटी ६ लाख ३३ हजार २६९ पुरुष, १ कोटी १ लाख ८६ हजार ९६५ महिला; तर ४६८ इतर मतदारांचा समावेश आहे. त्यांच्यासाठी एकूण २५ हजार ४७१ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. संपूर्ण मतदान प्रक्रियेसाठी सुमारे १ लाख २८ हजार इतक्या मनुष्यबळाची व्यवस्था केली आहे. त्यात सुमारे १२५ निवडणूक निर्णय अधिकारी आणि १२५ सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठीच्या २५ हजार ४७१ मतदान केंद्रांची संख्या लक्षात घेऊन पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ५१ हजार ५३७ कंट्रोल युनिट आणि १ लाख १० हजार ३२९ बॅलेट युनिटचा समावेश आहे. त्यासाठी सर्व सबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षणदेखील देण्यात आले आहे.

जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका नेहमी एकाच वेळी घेण्यात येतात. त्यामुळे प्रत्येक मतदाराला एक मत जिल्हा परिषदेच्या निवडणूक विभागासाठी आणि एक मत पंचायत समितीच्या निर्वाचक गणासाठी द्यावे लागते. जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी (गट) मतदान यंत्रावर म्हणजे बॅलेट युनिटवर (बीयू) पांढऱ्या रंगाची; तर पंचायत समितीच्या निर्वाचक गणासाठी बीयूवर गुलाबी रंगाची मतपत्रिका असते. उमेदवारांची संख्या कमी असल्यास एकाच बीयूवर या दोन्ही मतपत्रिका असतात; परंतु उमेदवारांची संख्या अधिक असल्यास आवश्यकतेनुसार एकापेक्षा जास्त बीयूचा वापर केला जातो.



राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी उद्या (ता. ७) मतदान होत आहे. या निवडणुका म्हणजे आपले गाव व परिसराचे भवितव्य ठरविणाऱ्या असतात. म्हणूनच या निवडणुकांमध्ये मोठ्या संख्येने मतदान करून आपणही आपल्या गाव व परिसराच्या उन्नतीत मोलाचे योगदान देऊ शकतो. त्याचबरोबर या निवडणुकांच्या माध्यमातून आपण लोकशाहीचा पाया बळकट करण्यातही हातभार लाऊ शकतो. त्यामुळे जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्ये मतदान करून आपण मतदानाचा आपला बहुमोल हक्क बजवायलाच हवा, त्यासाठी आपण नक्की मतदान करावे, असे मी सर्व संबंधित मतदार बंधू- भगिनींना नम्रपणे आवाहन करतो, असे राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी म्हटले आहे.

## इस्लामाबादच्या स्फोटात ६९ जणांचा मृत्यू; १६९ गंभीर जखमी

**आत्ताच एक्सप्रेस**

**इस्लामाबाद–** पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमधील एका शिया मशिदीत (इमांबरा) आज (६ फेब्रुवारी) नमाज पढत असताना आत्मघातकी हल्ला झाला. पाकिस्तानी वृत्तपत्र डॉनच्या वृत्तानुसार, या हल्ल्यात ६९ जणांचा मृत्यू झाला आणि १६९ जण जखमी झाले. पोलीस आणि बचाव पथक घटनास्थळी पोहोचले आहेत. त्यांनी बचाव कार्य सुरू केले आहे. रुग्णालयांना सतर्क करण्यात आले आहे आणि जखमींना हलवण्यात येत आहे. स्फोटानंतर, इस्लामाबाद पोलिस प्रमुखांनी शहरात आणीबाणी जाहीर केली. मृतांची संख्या वाढू शकते अशी अधिकाऱ्यांना



भीती आहे.

स्फोट इतका भयंकर होता की साधारण १०० हून अधिक लोक या मध्ये जखमी झाले आहेत. शिया मशिदीजवळ हा स्फोट झाला. लोक या ठिकाणी रक्तबंबाळ अवस्थेत दिसून आले. तसंच एकच गदारोळ या ठिकाणी पाहण्यास मिळाला. मृतांच्या संख्येत वाढ होत आहे अशीही माहिती पाकिस्तानातल्या स्थानिक वृत्तसंस्थांनी दिली आहे.

इस्लामाबादच्या शहजाद टाऊन भागात इमाम बारगाह या ठिकाणी जुम्मा (शुक्रवार) नमाज पठणाच्या वेळीच स्फोट झाला आहे. आत्मघातकी हल्लेखोराने स्वतःला उडवलं आणि स्फोट घडवून आणला.

पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांनी स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांबद्दल शोक व्यक्त केला. ते म्हणाले की, निष्पाप लोकांना लक्ष्य करणे मानवतेच्या विरोधात आहे. जखमींच्या जलद पुनर्प्राप्तीसाठी झरदारी यांनी प्रार्थना केली आणि अधिकाऱ्यांना त्यांना सर्वोत्तम वैद्यकीय सेवा देण्याचे निर्देश दिले.

पाकिस्तानी सरकारचे मंत्री डॉ. तारिक फजल चौधरी यांनी सोशल मीडियावर लिहिले की, ‘‘मी इस्लामाबादमधील स्फोटाचा तीव्र निषेध करतो. जीवितहानीमुळे मला दुःख झाले आहे.‘‘ अशा दहशतवादी घटनांमुळे देश आणि तेथील लोकांचे मनोबल खचू शकत नाही. आपण सर्वांनी शांतता, सहिष्णुता आणि स्थिरतेसाठी एकत्र आले पाहिजे आणि कायदा अंमलबजावणी संस्थांसोबत खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. एचटीएन वर्ल्ड या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, मशिदीच्या गेटवर एका व्यक्तीने स्वतःला उडवून दिले. इस्लामाबाद पोलिस आणि बचाव पथके घटनास्थळी पोहोचली आहेत आणि जखमींना वाचवत आहेत. जखमींना पाकिस्तान इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (पीआयएमएस) आणि सीडीए रुग्णालयात नेण्यात आले आहे.

## वेदनेतून महाराष्ट्र सावरलेला नाही, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय घेतला आहे. ‘‘अजित पवार यांच्या निधनाच्या वेदनेतून महाराष्ट्र सावरलेला नाही. मी माझा सहकारी आणि मित्र गमावला आहे’’, असा भावना व्यक्त करत शिंदे यांनी वाढदिवस साजरा न करणार नसल्याची माहिती ‘एक्स’वरुन दिली. तसेच, कोणताही सोहळा आयोजित न करण्याचे आवाहन कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना केले आहे.

‘‘राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे साऱ्या महाराष्ट्रावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. यामुळे ०९ फ ेब्रुवारीला मी वाढदिवस साजरा करणार नाही’’, असे एकनाथ शिंदे यांनी एक्सवरुन केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. ‘‘अजिदादांच्या अकाली जाण्याच्या वेदनेतून महाराष्ट्र सावरलेला. मी माझा सहकारी आणि मित्र गमावला आहे. अजित पवार यांच्या निधनामुळे झालेली अपरिमित हानी भरुन येणारी नाही’’, असेही एकनाथ शिंदे यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे. एकनाथ शिंदे यांनी वाढदिवस साजरा करणार नसल्याचे सांगताना कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना देखील वाढदिवसानिमित्त कोणताही कार्यक्रम, सोहळा आयोजित न करण्याचे आवाहन केले आहे. ‘या दिवशी कार्यकर्ते, पक्षनेते, पदाधिकारी आणि नागरिकांनी पुष्पगुच्छ, भेटी आणू नयेत’, अशी विनंती देखील एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

## काश्मीर पाकिस्तानचा भाग होईल, पंतप्रधान शाहबाज शरीफ पुन्हा बरळले

**आत्ताच एक्सप्रेस**

**इस्लामाबाद –** पहलगाम येथील दहशतवादी हल्ला आणि त्यानंतर भारताने राबविलेल्या ऑपरेशन सिंदूरमुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध अधिक ताणले गेलेत. ऑपरेशन सिंदूर अपयशी ठरल्याचा दावा करणाऱ्या पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. ‘‘काश्मीर पाकिस्तानचा भाग होईल,’’ असे विधान शरीफ यांनी केले आहे. शरीफ गुरुवारी पाकव्याप्त काश्मीरमधील सभेला संबोधित करताना बोलत होते.

काश्मीर एकता दिनानिमित्त देशभरात रॅली आणि निदर्शने आयोजित केली जात असताना शरीफ यांचे विधान चर्चेत आले आहे. मुझफ्फराबादमधील विधानभवनासमोर उपस्थितांना संबोधित करताना शाहबाज यांनी हे वक्तव्य केले आहे. काश्मीरबाबत इस्लामाबादच्या भूमिकेचा उल्लेखही करताना पाकिस्तान काश्मिरी लोकांच्या समर्थनात उभा असल्याचा पुनरुच्चारही केला.

‘‘काश्मिरी लोकांच्या मताचा आदर करणे आणि संयुक्त राष्ट्राचा ठराव मान्य करणे हा जम्मू काश्मीरच्या मुद्यावर तोडगा आहे’’, असे शरीफ यावेळी म्हणाले. ‘‘पाकिस्तानची जनता आणि सरकार यांच्या वतीने काश्मिरी लोकांसोबत ठामपणे उभं राहण्यासाठी आणि समर्थन दर्शविण्यासाठी मी आलो आहे’’, असेही शरीफ यांनी सांगितले.

शरीफ यांनी यावेळी वादग्रस्त विधान करताना दोन्ही देशात तणाव निर्माण होईल असे वक्तव्य केले. ‘‘काश्मीर पाकिस्तानचा भाग होईल’’, असे शरीफ सभेला संबोधित करताना म्हणाले. मोहम्मद अली जिना यांच्या नावाचा उल्लेख करताना काश्मीर पाकिस्तानची रक्तवाहिनी असल्याचे नमूद केले. काश्मीरमध्ये आम्हाला शांतता हवी आहे. पण, ही शांतता समानता आणि न्याय या तत्वावर व्हावी, असे विधान त्यांनी सभेत केले.

पाकिस्तान काश्मीरवर करत असलेल्या दावा भारताने नेहमीच फेटाळून लावला आहे. जम्मू काश्मीर आणि लडाख हा भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि राहिल अशी भूमिका मांडली आहे. इस्लामाबाद नेहमीच नेहमी दहशतवादाला खतपाणी घालत असल्याचा आरोप भारताने केला आहे.

## राज्यातील ८ शहरांना मिळाले नवे महापौर; नागपूर, संभाजीनगरसह ६ शहरांत भाजपचा महापौर

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** राज्यातील ८ महापालिकांमध्ये आज महापौर व उपमहापौरपदाची निवडणूक पार पडली. यात नागपूर व छत्रपती संभाजीनगरसह ६ शहरांत सत्ताधारी भाजप, तर एका महापालिकेत सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचा महापौर खुर्चीत बसला आहे. उर्वरित एका ठिकाणी सध्या महापौर निवडीची प्रक्रिया सुरू आहे.

राज्यातील जळगाव, धुळे, कोल्हापूर, पिंपरी - चिंचवड, नागपूर, अमरावती, सोलापूर व नाशिक या ८ बड्या महापालिकांत आज महापौर निवडीची प्रक्रिया पार पडली. यात सोलापूर, जळगाव व अहिल्यानगर येथील चुरशीच्या वाटणाऱ्या निवडणुका ऐनवेळी बिनविरोध झाल्या. तर नागपूर व धुळ्यात भाजपने मोठ्या मताधिक्क्याने विजय मिळवला. सोलापूर महापालिकेच्या महापौरपदी भाजपच्या विनायक कोंड्याल यांची बिनविरोध निवड झाली. येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेना व एमआयएमच्या उमेदवारांनी ऐनवेळी माघार घेतल्यामुळे कोंड्याल यांचा मार्ग मोकळा झाला.

जळगाव महापालिकेत भाजपच्या दीपमाला काळे यांची महापौरपदी वर्णी लागली. तर शिवसेनेच्या शिंदे गटाचे मनोज चौधरी यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली. दीपमाला काळे या जळगाव महापालिकेच्या १७ व्या महापौर ठरल्या आहेत.

दुसरीकडे, नागपूर महापालिकेत भाजपच्या नीता ठाकरे यांनी तब्बल १०४ मते मिळवत काँग्रेसच्या स्नेहल ठाकरे यांचा पराभव केला आहे. या ठिकाणी झालेल्या निवडणुकीत नीता ठाकरे यांना १०४, तर स्नेहल ठाकरे यांना ३६ मते पडली. ११ मतदारांनी येथे तटस्थ भूमिका बजावली. परिणामी, नीता ठाकरे यांचा मोठ्या मतफरकाने विजय झाला आहे. उपमहापौरपदी भाजपच्याच लीला हाथीबेड यांची नियुक्ती झाली आहे.

धुळे महापालिकेत सत्ताधारी महायुतीच्या घटकपक्षांत दुरंगी लढत दिसून आली. येथे भाजपच्या मायादेवी परदेशी यांनी ५० मते मिळवत महापौरपदी विजय मिळवला. तर सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेच्या संयुक्त उमेदवाराला अवघ्या १३ मतांवर समाधान मानावे लागले. तिकडे नांदेड महापालिकेत पहिल्यांदाच भाजपचा महापौर विराजमान झाला आहे. नांदेड महापालिकेच्या ८१ पैकी ४५ जागा जिंकत भाजपने स्पष्ट बहुमत मिळवले आहे. येथे भाजपने महापौरपदासाठी कविता मुळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. येथे उपमहापौरपदासाठी दीपकसिंह रावत यांचे नाव निश्चित करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या महापौरपदासाठी समीर राजूरकर व उपमहापौरपदासाठी राजेंद्र जंजाळ यांचे नाव निश्चित झाले आहे. येथे राजेंद्र जंजाळ यांच्या नावाला विरोध होण्याची शक्यता आहे.

यामुळे उपमहापौरपदाविषयी सध्या मोठी संभ्रमावस्थ आहे. पण सूत्रांच्या मते, त्यांच्या नावाच्या घोषणेची केवळ औपचारिकता शिल्लक राहिली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेतही भाजपच्या शर्मिला बाबर यांचे नाव महापौरपदासाठी निश्चित झाल्याची माहिती आहे. येथेही महापौर निवडीची प्रक्रिया सध्या सुरू आहे.

## लोकसभेत गोंधळ आणि घोषणाबाजी सुरुच; कामकाज ९ फेब्रुवारीपर्यंत स्थगित; फक्त १० मिनिटे कामकाज

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली –** लोकसभेत गोंधळ आणि घोषणाबाजी आज (६ फेब्रुवारी) सुद्धा राहिली. पहिल्यांदा कामकाज फक्त तीन मिनिटे चालले आणि दुसऱ्यांदा सात मिनिटे चालले. त्यानंतर, लोकसभा ९ फ ेब्रुवारीपर्यंत तहकूब करण्यात आली. दरम्यान, केंद्रीय मंत्री रवनीत बिट्टू यांनी राहुल गांधींवर टीका करताना म्हटले की, ‘‘काल सर्वांनी त्यांना अबोध बालक म्हटले. आज पंतप्रधानांची शाळा होती, जिथे मुलांना यशस्वी होण्यास शिकवले जाते. जर राहुल गांधीही पंतप्रधानांच्या शाळेत गेले असते तर ते आयुष्यात यशस्वी झाले असते.‘‘ गुरुवारी लोकसभा आणि राज्यसभेत गोंधळाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्ताव मंजूर करण्यात आला. २००४ नंतर पहिल्यांदाच पंतप्रधानांच्या भाषणाशिवाय लोकसभेत हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. राज्यसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भाषणानंतर हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

जेव्हा सभापती ओम बिर्ला यांनी सुरक्षेच्या कारणास्तव पंतप्रधान मोदींना लोकसभेत भाषण न करण्यास सांगितले तेव्हा काँग्रेस खासदार माणिकम टागोर म्हणाले, ‘‘आम्ही जगाचे नेते आहोत.‘‘ आमचे पंतप्रधान ५६ इंचाच्या छातीचे नेते आहेत आणि ते स्वतःच्या घरातही पाकिस्तानी लोकांचा सामना करू शकतात. ते असे नाटक का करत आहेत आणि असे खोटेपणा का पसरवत आहेत? लोकसभा हे ते ठिकाण आहे जिथून ते निवडून आले. ते त्यातील एक सदस्य आहेत. ते खासदारांवर आरोप करत आहेत.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, ‘‘आम्ही शीख समुदायाचा आदर करतो, आमच्या सरकारमध्ये मनमोहन सिंग अर्थमंत्री होते. भाजप शीख, दलित आणि आदिवासींचा आदर करत नाही; गेल्या १० वर्षांत त्यांनी काँग्रेसला शिव्या देण्याशिवाय काहीही केलं नाही.‘‘ राज्यसभेत पंतप्रधानांच्या भाषणाला उत्तर देताना खरगे यांचे हे विधान आले आहे, जेव्हा पंतप्रधान म्हणाले होते की काँग्रेस शीखांबद्दल द्वेषाने भरलेली आहे.

समाजवादी पक्षाचे खासदार राजीव राय म्हणाले, ‘‘जर पंतप्रधानांनी याला मान्यता दिली असेल किंवा ते योग्य मानले असेल, तर सभागृहात बसून आपल्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, ज्या आता या जगात नाहीत, त्यांच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असेल आणि नेहरूंना देशद्रोही म्हटले असेल, तर ते या देशासाठी अत्यंत दुर्दैवी आहे.‘‘ अर्थसंकल्पीय अधिवेशन ६५ दिवसांत ३० बैठकांसाठी चालेल. ते २ एप्रिल रोजी संपेल. २८ जानेवारी रोजी सुरू झालेला पहिला टप्पा १३ फ ेब्रुवारी रोजी संपेल. त्यानंतर दुसरा टप्पा ९ मार्च रोजी सुरू होईल. लोकसभेत नऊ विधेयके प्रलंबित आहेत, ज्यात डेव्हलप्ड इंडिया एज्युकेशन फाउंडेशन बिल २०२५, सिक्युरिटीज मार्केट्स कोड २०२५ आणि संविधान (१२९ वी सुधारणा) बिल २०२४ यांचा समावेश आहे. ही विधेयके सध्या संसदीय स्थायी किंवा निवड समित्यांद्वारे तपासली जात आहेत.

## लाडक्या बहिणींना ई-केवायसी दुरुस्तीसाठी शेवटची संधी, ३१ मार्चपर्यंत पोर्टल सुरु

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर –** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अनेक लाभार्थी महिलांकडून पैसे मिळाले नसल्यानं राज्यभरात विविध ठिकाणी मोर्चे काढण्यात आले होते. ई- केवायसी संदर्भातील पर्याय निवडताना काही चुकीचे पर्याय निवडले गेल्यानं महिलांचे पैसे थकले असल्याची चर्चा होती. अखेर महिला व बाल विकास विभागानं ई-केवायसीचं पोर्टल पुन्हा सुरु केलं आहे. आजपासून या पोर्टलवरुन ई-केवायसी दुरुस्ती ३१ मार्चपर्यंत करता येणार आहे.

लाडकी बहीण ई-केवायसी पोर्टल आजपासून सुरू करण्यात आलं आहे. गेल्या काही दिवसांपासून ई-केवायसी पोर्टल बंद असल्याने लाडक्या बहिणींचे पैसे थांबले होते. राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाने आदेश काढून पोर्टल सुरू केले आहे. या निर्णयामुळं लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळाला असून आता ३१ मार्चपर्यंत ई-केवायसी दुरुस्ती करता येणार आहे.

यापूर्वी मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांनी - माध्यमातून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत आधार प्रमाणीकरण करुन - प्रक्रिया पूर्ण केली आहे. मात्र ती प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थी महिलांकडून ‘‘लाभार्थ्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे‘‘ याबाबत पर्याय निवडताना चुकीचा पर्याय निवडला गेल्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

योजनेतील निकषाच्या अनुषंगाने सदर लाभार्थी महिलांची सखोल तपासणी करुन लाभार्थ्यांच्या पात्रता/अपात्रतेची प्रत्यक्ष पडताळणी करण्याबाबत सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांना शासनानं २० जानेवारी रोजी कळवलं होतं.

## लाईफगुरुचा खरा चेहरा कोणता?

आयुष्य कसे जगावे, जगण्याचा अर्थ काय आहे आणि मनः शांती कशी मिळवावी यावरचे ज्ञान देणारा नव्वदहून अधिक पुस्तके लिहिणारा लेखक जेव्हा जेफ्री एप्स्टीन या विकृत लिंगपिसाटाच्या संपर्कात येतो आणि लहान मुली क्युट असतात असं त्या अर्थाने म्हणतो; मुलींना घेऊन या, मजा येईल असं सांगतो तेव्हा लाइफगुरुचा भ्रमाचा भोपळा फुटतो आणि समोर उरतो तो वासनेचा प्रश्नांकित चेहरा! दीपक चोप्रा यांच्याविषयी हे लिहिलं आहे, हे एव्हाना तुम्ही ओळखलं असेलच! मन:शांती कशी मिळवावी हे जगाला सांगणाऱ्या इसमाला एका विकृताशी मैत्री करावी वाटते आणि त्याच्याकडील मुलींविषयी आसक्ती निर्माण होते तेव्हा त्याला काय म्हणावे हे तुम्हीच ठरवावे! दीपक चोप्रा हे भारतीय वंशाचे अमेरिकन लेखक, वैकल्पिक चिकित्सा प्रचारक आणि आध्यात्मिक गुरू म्हणून जगप्रसिद्ध आहेत. २२ ऑक्टोबर १९४६ रोजी दिल्लीत जन्मलेल्या चोप्रांनी ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (एआयएमएस) मधून वैद्यकीय पदवी घेतली आहे. १९७० साली ते अमेरिकेत स्थलांतरित झाले. सुरुवातीला एंडोक्रिनोलॉजीमध्ये काम करत असताना, त्यांनी आयुर्वेद आणि ध्यान यांचा अभ्यास सुरू केला. १९९० च्या दशकात त्यांनी द सेव्हन स्पिरिच्युअल लॉज ऑफ सक्सेस सारखी पुस्तके लिहून आध्यात्मिक आणि आरोग्य क्षेत्रात लोकप्रियता मिळवली. चोप्रा फाउंडेशन आणि चोप्रा सेंटर फॉर वेलबिइंगची स्थापना केली, जिथे ते ध्यान, योग आणि वैकल्पिक उपचारांना प्रोत्साहन देतात. त्यांच्या नव्वदहून अधिक पुस्तकांनी जगभरातील लाखो लोकांना प्रभावित केले आहे, पण विज्ञानवादी समीक्षक त्यांच्या दाव्यांना छद्मविज्ञान म्हणतात. जेफ्री एप्स्टीन प्रकरणात त्यांचे नाव आल्याने, त्यांच्या प्रतिमेला धक्का बसला आहे; लोक सर्वत्र त्यांची उघड निर्भत्सना करताना दिसताहेत. २०१६ ते २०१९ दरम्यान त्यांनी एप्स्टीनला पाठवलेले ईमेल आणि त्यांच्या परस्पर भेटीचे तपशील नुकतेच सार्वजनिक करण्यात आले आहेत. एप्स्टीन हा अमेरिकन दलाल, भांडवलदार आणि पतपुरवठा करणारा अधम होता हे आता सर्वांना ठाऊक झालेय. बाल लैंगिक गुन्ह्यात तो दोषी सिद्ध झाला होता. २००८ सालीही त्याच्यावर हेच आरोप झाले होते. २०२५ मध्ये अमेरिकन हाउस ओव्हरसाइट कमिटीने एप्स्टीनच्या वीस हजारहून अधिक पृष्ठांच्या फाइल्स उघड केल्या, ज्यात दीपक चोप्रा यांचे नाव तीन हजारहून अधिक वेळा आले आहे. हे ईमेल आणि यातील कॅलेंडर एंट्रीज २००८ च्या दोषारोपानंतरच्या आहेत, ज्यात चोप्रा आणि एप्स्टीन यांच्यात आर्थिक सल्ला मसलत, सामाजिक भेटी आणि वैयक्तिक चर्चा झाल्या आहेत. चोप्रा यांनी एप्स्टीनला डिनर, ध्यान सत्र आणि परिषदांसाठी आमंत्रित केले आहे, ज्यात वुडी ॲलन आणि नोम चॉम्स्की सारख्या व्यक्तींचा समावेश आहे. आपले नाव समोर आल्यावर दीपक चोप्रा यांनी या संबंधांना आपल्यातला सीमित संवाद होता असे म्हटले आहे आणि कोणत्याही गुन्ह्यात सहभाग नाकारला आहे, तसेच अधिकृत तपास अधिकाऱ्यांसोबत माहिती शेअर करण्याची तयारी दाखवली आहे. मात्र, ईमेल्समधील काही उल्लेख विवादास्पद आहेत, ज्यात ''क्यूट गर्ल्स'' आणि ''ब्रिंग युवर गर्ल्स'' सारखे शब्द आहेत, जे एप्स्टीनच्या विकृत पार्श्वभूमीमुळे प्रश्न उपस्थित करतात. त्यामुळे दीपक चोप्रा यांना इतकी सहजपणे आपली मान यातून मोकळी करता येणार नाही. एप्स्टीन फाइल्समध्ये चोप्रा आणि एप्स्टीन यांच्यातील अनेक ईमेल्स आहेत. नोव्हेंबर २०१६ च्या एका ईमेलमध्ये, एप्स्टीनने चोप्रांना डेली मेलच्या एका बातमीचा लिंक पाठवलीय, ज्यात ट्रम्प आणि एप्स्टीनवर आरोप करणाऱ्या केटी जॉन्सन नावाच्या महिलेच्या आरोपांचा उल्लेख आहे. त्यात चोप्रांनी विचारलेय, ''डिड शी अल्सो ड्रॉप सिव्हिल केस अगेन्स्ट यू?'' (तीने तुमच्याविरुद्धचा सिव्हिल केसही मागे घेतलीय का?) एप्स्टीनने उत्तर दिलेय, होय. त्यावर चोप्रांनी प्रतिसाद दिला, गुड.

जुलै २०१६ च्या दुसऱ्या एका ईमेलमध्ये, चोप्रांनी एप्स्टीनला ट्रम्पच्या पूर्व पत्नी मारला मॅपल्सबद्दल विचारले आहे. एप्स्टीनने सांगितले की, मॅपल्स गर्भवती झाल्यावर, ट्रम्पबरोबरची दहा हजार डॉलर्सची पैज तो हरला होता आणि बदल्यात बेबी फूडच्या ट्रकने त्याची भरपाई करावी लागली. मार्च २०१७ च्या अन्य एका ईमेलमध्ये, मनःशांती आणि जागरूकतेबद्दल चर्चा करताना, चोप्रा लिहितात की, ''गॉड इज अ कन्स्ट्रक्ट. क्यूट गर्ल्स आर रिअल'' (देव ही एक मानवी कल्पना आहे. क्यूट मुली हे वास्तव आहे). २०१७ च्या फेब्रुवारीमध्ये, चोप्रांनी एप्स्टीनला इस्रायलला आमंत्रित केलेलं: ''कम टू इस्रायल विथ अस. रिलॅक्स अँड हॅव फन विथ इंटरेस्टिंग पीपल. इफ यू वॉन्ट यूज अ फेक नेम. ब्रिंग युवर गर्ल्स. इट विल बी फन टू हॅव यू'' (आमच्यासोबत इस्रायलला या. आराम करा आणि आवडेल त्या लोकांसोबत मजा करा. जर तुम्हाला हवे तर बनावट नाव वापरा. तुमच्या मुली घेऊन या. तुम्हाला घेऊन मजा येईल). अन्य एका ईमेलमध्ये, एप्स्टीनने चोप्रांच्या कार्यक्रमासाठी दोन मुली पाठवण्याची ऑफर दिली आहे, ज्यावर चोप्रांनी नावे मागितली आहेत. हे कशाचे द्योतक आहे? दीपक चोप्रा यांना त्या मुली कशासाठी हव्या होत्या? एप्स्टीन फाइल्सचे संपूर्ण प्रकरण हा एक भयानक आणि जटिल घटनाक्रम आहे, ज्यात शक्तिशाली व्यक्तींच्या नेटवर्कमुळे पीडितांच्या न्यायाची प्रक्रिया गुंतागुंतीची झाली आहे. दीपक चोप्रा यांच्यावर कोणतेही गुन्हेगारी आरोप नसले तरी ईमेल आणि भेटींमधून जे उल्लेख समोर येताहेत ते धक्कादायक आहेत हे कुणीही मान्य करेल. एप्स्टीनच्या लैंगिक विकृतीची पार्श्वभूमी लक्षात घेता, हे संबंध नैतिकदृष्ट्या प्रश्नांकितच ठरतात. त्यामुळे चोप्रासारख्या लोकांची प्रतिमा भंग होऊन लोकांचा भ्रमनिरास होणे स्वाभाविक आहे. चोप्रा यांच्या आध्यात्मिक शिकवणींमधून प्रेरणा घेणाऱ्यांनी, चोप्रा यांचे एप्स्टीनसोबतचे संबंध विज्ञान आणि चिकित्सक दृष्टीने तपासणे अपेक्षित आहे. चोप्रा असो की अन्य कुणीही असो ज्यांची नावे यात येताहेत त्यांच्या विरोधातील संताप पीडितांच्या समर्थनासाठीही वापरला जावा किंवा अशा नेटवर्क्सविरुद्ध जागरूकता वाढवण्यासाठी त्याचा वापर व्हायला पाहिजे. एप्स्टीन फाइल्सवरती व्यक्त होताना नेहमीच सत्याच्या शोधात धैर्याने पुढे जाणे अनिवार्य आहे आणि प्रत्येक दोषी व्यक्तींना (मग ते कुणीही असले तरीही) त्यांच्या कृतींसाठी जबाबदार धरले तरच आपल्यातील नैतिकता सचेत आहे आणि आपण दांभिक नैतिकतावादी नसून खऱ्या अर्थाने न्यायवादी आहोत असे म्हणता येईल.

**– समीर गायकवाड**

# रमाबाई आंबेडकरांचे सामाजिक परिवर्तनाच्या पायाभरणीतील योगदान

७ फेब्रुवारी हा दिवस भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अत्यंत अर्थपूर्ण, संवेदनशील आणि प्रेरणादायी ठरतो. हा दिवस म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनसाथी, त्यागमूर्ती, संघर्षशील आणि मौनात राहूनही सामाजिक क्रांतीची मशाल पेटती ठेवणाऱ्या रमाबाई भिमराव आंबेडकर यांचा जयंती दिन होय. भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय विषमता, सामाजिक अन्याय, स्त्रीदमन, आर्थिक दारिद्र्य आणि मानसिक गुलामगिरीच्या पार्श्वभूमीवर रमाबाईंचे जीवन केवळ एका महापुरुषाच्या पत्नीचे जीवन नव्हते. ते जीवन एका स्वतंत्र सामाजिक योद्ध्याचे, अपार सहनशीलतेचे, निःस्वार्थ त्यागाचे आणि मौनातून घडलेल्या क्रांतीचे जिवंत प्रतीक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक, शैक्षणिक आणि राजकीय संघर्षामागे रमाबाईंच्या कष्टांची, वेदनांची आणि शांत पाठबळाची भक्कम भिंत उभी होती, हे वास्तव समजून घेतल्याशिवाय आंबेडकरी चळवळीचे संपूर्ण चित्र स्पष्ट होत नाही.

रमाबाई आंबेडकर यांचा जन्म अत्यंत साध्या, उपेक्षित आणि सामाजिकदृष्ट्या वंचित परिस्थितीत झाला. त्या काळातील दलित समाजाचे जीवन म्हणजे अपमान, अस्पृश्यता, दारिद्र्य, बहिष्कार आणि सततची असुरक्षितता यांचा संगम होता. स्त्री म्हणून जन्माला येणे म्हणजे दुहेरी अन्याय सहन करणे, हीच त्या समाजाची वास्तवता होती. शिक्षण, स्वातंत्र्य, निर्णयक्षमता, आरोग्य आणि आत्मसन्मान या मूलभूत हक्कांपासून स्त्रीला वंचित ठेवणारी सामाजिक रचना रमाबाईंच्या आयुष्यावरही खोलवर परिणाम करत होती. बालपणापासूनच कष्ट, काम, जबाबदाऱ्या आणि मौनातील सहनशीलता हेच त्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग बनले. लहान वयातच जीवनातील कठोर वास्तव स्वीकारावे लागल्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व संयमी, सहनशील आणि आत्मसंयमी बनले.

अत्यंत लहान वयात रमाबाईंचा विवाह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी झाला. हा विवाह म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधील कौटुंबिक नाते नव्हते, तर तो एका व्यापक सामाजिक संघर्षाचा प्रारंभ होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आयुष्य शिक्षण, विचार, आंदोलन, संघर्ष आणि सामाजिक विरोधाने भरलेले होते. या संघर्षांचा भार रमाबाईंनाही समानतेने पेलावा लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणासाठी, नोकरीसाठी आणि समाजसुधारणेसाठी सातत्याने व्यग्र असताना रमाबाई घर, कुटुंब, मुले आणि सामाजिक वास्तव यांचा समतोल राखत होत्या. संसार सांभाळताना त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ध्येयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले नाही, उलट त्या ध्येयांवर त्यांनी अढळ विश्वास ठेवला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उच्च शिक्षण भारताबाहेर सुरू असताना रमाबाईंवर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी येऊन पडली. आर्थिक टंचाई, अन्न-वस्त्राचा अभाव, आजारपण, सामाजिक उपेक्षा आणि मानसिक ताण हे त्यांचे रोजचे वास्तव होते. अनेक वेळा उपाशीपोटी दिवस काढावे लागले, साध्या वस्त्रांवर समाधान मानावे लागले. तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, हीच त्यांची ठाम भूमिका होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचनी मिळवलेले ज्ञान हे केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नसून संपूर्ण समाजाच्या मुक्तीसाठी आहे, याची रमाबाईंना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच त्यांनी स्वतःच्या वेदनांवर मौन धारण करून सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाला बळ दिले.

रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील सर्वांत वेदनादायी आणि हृदयद्रावक अध्याय म्हणजे त्यांच्या मुलांचे अकाली निधन होय. मातृत्वाचा आनंद अनुभवण्याआधीच त्यांना असह्य दुःख सहन करावे लागले. एका मागोमाग एक अपत्य गमावणे ही कोणत्याही आईसाठी अकल्पनीय वेदना असते. रमाबाईंच्या आयुष्यात ही वेदना वारंवार आली. तरीही त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर त्याचा परिणाम होऊ दिला नाही. स्वतःच्या दुःखाला



बाजूला ठेवून समाजासाठी झटणाऱ्या पतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, हेच त्यांनी आपले जीवनधर्म मानले. रमाबाईंचा हा त्याग भारतीय स्त्रीच्या सहनशीलतेचा, मानसिक बळाचा आणि निस्वार्थ प्रेमाचा सर्वोच्च नमुना आहे.

रमाबाई आंबेडकर या जरी प्रत्यक्ष सामाजिक आंदोलनांच्या मंचावर दिसत नसल्या, तरी त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे, मूलभूत आणि निर्णायक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना स्थैर्य देणारे, त्यांच्या संघर्षाला मानसिक आधार देणारे आणि त्यांच्या आयुष्यातील अत्यंत कठीण काळात खंबीरपणे साथ देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे रमाबाई आंबेडकर होत्या. अस्पृश्यता निवारण, शिक्षणाचा प्रसार, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, धर्मांतर चळवळ आणि भारतीय संविधाननिर्मिती यांसारख्या ऐतिहासिक कार्यांसाठी बाबासाहेबांना जे मानसिक बळ आवश्यक होते, ते रमाबाईंच्या निस्वार्थ त्यागातून मिळाले.

रमाबाईंचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे, शांत, संयमी आणि आत्मसन्मानाने भरलेले होते. प्रसिद्धी, सन्मान, मान्यता किंवा सार्वजनिक गौरवाची अपेक्षा त्यांनी कधीच ठेवली नाही. समाजाने अनेकदा त्यांच्याकडे केवळ 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्नी' म्हणून पाहिले, परंतु प्रत्यक्षात त्या एका स्वतंत्र विचारसरणीच्या, मूल्यनिष्ठ आणि आत्मसन्मान जपणाऱ्या स्त्री होत्या. अपमान, दुर्लक्ष, अवहेलना आणि कष्ट सहन करूनही त्यांनी कधी तक्रार केली नाही. त्यांचे मौन हे कमजोरीचे नव्हे, तर अंतर्गत शक्तीचे, संयमाचे आणि आत्मविश्वासाचे प्रतीक होते.

भारतीय समाजातील स्त्री-पुरुष समानतेच्या चर्चेत रमाबाई आंबेडकर यांचे जीवन अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यांनी स्त्रीवादावर भाषणे केली नाहीत, लेखन केले नाही, परंतु त्यांच्या जीवनाने स्त्रीच्या सामाजिक भूमिकेची नवी व्याख्या केली. शिक्षणापासून वंचित असूनही त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक ध्येयांना त्यांनी पूर्ण पाठिंबा दिला. त्यांच्या जीवनातून हे स्पष्ट होते की स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून ती सामाजिक परिवर्तनाची शांत पण प्रभावी वाहक असते.

रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील दारिद्र्य हे केवळ आर्थिक नव्हते, तर ते सामाजिक अन्यायाचे आणि संरचनात्मक विषमतेचे प्रतीक होते. जातीय भेदभाव, सामाजिक बहिष्कार, धार्मिक रूढी आणि स्त्री म्हणून दुय्यम स्थान या सगळ्यांचा परिणाम त्यांच्या आयुष्यावर झाला. तरीही त्यांनी परिस्थितीला दोष देत बसण्याऐवजी आशेचा मार्ग स्वीकारला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर, मूल्यांवर आणि ध्येयांवर ठेवलेला विश्वास हेच त्यांच्या जगण्याचे बळ होते. त्यांच्या जीवनातून हे अधोरेखित होते की सामाजिक परिवर्तनासाठी फक्त पुढे उभे राहणारे नेतेच नव्हे, तर मागे उभे राहून आधार देणारे व्यक्तिमत्त्वही तितकेच महत्त्वाचे असते.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन स्त्रीवादाचा अप्रत्यक्ष पण प्रभावी आधारस्तंभ आहे. त्यांनी शब्दांतून स्त्रीवाद मांडला नाही, परंतु त्यांच्या जीवनप्रवासाने स्त्रीच्या दुहेरी संघर्षाचे वास्तव जगासमोर ठेवले. जातीय अन्याय आणि पितृसत्ताक व्यवस्था या दोन्हींचा सामना करत त्यांनी आपले जीवन जगले. आजच्या स्त्री-अभ्यासात रमाबाईंच्या जीवनाकडे केवळ सहनशीलतेचे प्रतीक म्हणून नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत मोलाचे योगदान देणाऱ्या स्त्री म्हणून पाहिले जाणे आवश्यक आहे.

आजच्या काळात रमाबाई आंबेडकर यांचे स्मरण केवळ औपचारिक जयंतीपुरते मर्यादित राहू नये. त्यांच्या जीवनाचा अभ्यास करताना स्त्री-संघर्ष, दलित प्रश्न, कुटुंबातील त्याग, मानसिक सहनशीलता, भावनिक श्रम आणि सामाजिक परिवर्तनातील अदृश्य योगदान या सर्व पैलूंवर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. रमाबाईंच्या जीवनकथेचा समावेश शिक्षणक्रमात, सामाजिक चर्चेत, स्त्री-अभ्यासात आणि दलित साहित्याच्या अभ्यासात होणे ही काळाची गरज आहे.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन हे भारतीय समाजाच्या वास्तवाचे आरसेपण आहे. त्या समाजाच्या कडेला उभ्या राहिलेल्या, पण परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असलेल्या स्त्रीचे प्रतीक आहेत. त्यांनी कधीही स्वतःसाठी इतिहास लिहिला नाही, परंतु त्यांच्या त्यागाने इतिहास घडविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कार्यामागील अदृश्य शक्ती म्हणून रमाबाईंचे स्थान अढळ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना त्यांच्या मूल्यांना आत्मसात करणे, हेच त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य ठरेल.

रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ अभिवादन न करता त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आजच्या सामाजिक प्रश्नांकडे नव्या दृष्टीने पाहिले पाहिजे. स्त्री सक्षमीकरण, सामाजिक न्याय, मानवी मूल्यांची जोपासना, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांच्या अंमलबजावणीसाठी रमाबाईंचे जीवन मार्गदर्शक ठरते. त्यांचे मौन आजही आपल्याशी बोलते, त्यांचा त्याग आजही समाजाला प्रश्न विचारतो आणि त्यांचे जीवन आजही परिवर्तनाची प्रेरणा देते. म्हणूनच रमाबाई भिमराव आंबेडकर या केवळ इतिहासातील व्यक्तिमत्त्व नाहीत, तर त्या वर्तमान आणि भविष्याला दिशा देणाऱ्या विचारांची अखंड साक्ष आहेत.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**
समाजशास्त्राचे अभ्यासक

# मुख्यमंत्र्यांच्या दूरदृष्टीने राज्यात भूजल सुधार; ३५२ तालुक्यांत सकारात्मक बदल!

कोणत्याही राज्याला सुजलाम सुफलाम होण्यासाठी व जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी भूजलाचा स्तर चांगला असणे गरजेचे असते. भूजलस्तर सुधार म्हणजे दुष्काळापासून मुक्तता हा मंत्र ठरला आहे. राज्याला दुष्काळ मुक्त करण्याचा हाच ध्यास व मंत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उराशी बाळगून वर्ष २०१५ च्या सुरुवातीलाच 'जलयुक्त शिवार' ही महत्वाकांक्षी योजना राबविण्याचा निर्णय घेतला. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीतून भूजलस्तर वाढून राज्यात दुष्काळी भागाची स्थिती सुधारली. या कार्यक्रमाला जोड म्हणून मुख्यमंत्र्यांच्या सक्षम नेतृत्वात राज्यामध्ये केंद्र पुरस्कृत 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना', 'अटल भूजल योजना' आणि 'जलजीवन मिशन' ची अंमलबजावणीही प्रभावीपणे होत आहे. परिणामी केंद्र शासनाच्या दुष्काळ व्यवस्थापन संहितेप्रमाणे विहित कार्यपद्धतीत अंतर्गत भूजल दुष्काळ निर्देशांकानुसार वर्ष २०२५ अखेर राज्यातील ३५३ तालुक्यांपैकी ३५२ तालुक्यांत दुष्काळ नसल्याचे व भूजल तूट वर्गवारी सामान्य असल्याची आणि मागील दहा वर्षांच्या तुलनेत भूजल स्तर १.५२ मीटरने वाढल्याची सुवार्ता पुढे आली आहे.

राज्याच्या ग्रामीण भागातील जनतेच्या उपजीविकेचा मुख्य स्रोत शेतीच आहे, तर ८२ टक्के भूभाग हा पावसावर अवलंबून आहे. विशेषत: मराठवाडा आणि विदर्भातील काही गावांमध्ये अनिश्चित व अपुऱ्या पावसामुळे दुष्काळी स्थिती निर्माण होऊन लोकांच्या राहणीमानावर आणि शेतीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचे चित्र होते. पिण्याच्या पाण्याची टंचाई, भूजल पातळीत होणारी तूट भरून काढण्यासाठी व या सर्व परिस्थितीत कृतीशील कार्याद्वारे बदल करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने २६ जानेवारी २०१५ रोजी राज्यात 'जलयुक्त शिवार' ही महत्वाकांक्षी योजना राबविण्यास सुरुवात झाली. २५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याच्या उद्दिष्टातून लोकसहभागाद्वारे सूक्ष्म सिंचन आणि पावसाचे पाणी साठविण्यास सुरुवात झाली. स्थानिक जलप्रवाहांना मोठ्या जलप्रवाहांशी आणि नैसर्गिक प्रवाह उपलब्ध नसलेल्या ठिकाणी जलवाहिन्या तयार करून जलप्रवाहांशी जोडण्यात आले. पाण्याच्या प्रवाहाची आवक होऊन हे पाणी संवर्धनासाठी सूक्ष्म जलसाठ्यांमध्ये वाहून नेण्यात येऊ लागले. उपलब्ध जलप्रवाहांचे पुनरुज्जीवन करण्यावर आणि गावांमध्ये नवीन जलप्रवाह निर्माण करण्यावर भर देण्यात आला.

नद्यांच्या तळांचे रुंदीकरण आणि खोलीकरण करण्यावर भर देण्यात आला. पाण्याची झिरपण रोखण्यासाठी तलाव, तळी, शेततळे आणि कालव्यांमधून गाळ काढण्यात आला. चेकडॅम, कालवे, लहान तलाव आणि सार्वजनिक व खाजगी विहीरी बांधण्यात आल्या. पावसाच्या पाण्याची साठवण करण्यात आली. विशेष करून दुष्काळी भागात वाहून जाणारे पावसाचे पाणी अडविण्यात आले. शेतीसाठी कार्यक्षमतेने पाणी वापराबाबत जागरूकता निर्माण करून शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले आणि मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणही करण्यात आले. परिणामी २०१९ पर्यंत राज्यात अतिरिक्त पाणी साठवण क्षमता निर्माण होऊन १९ हजार ६५५ गावे कायमस्वरूपी दुष्काळ मुक्त झाले. याकाळातच २२ हजार ५३९ गावांमध्ये 'जलयुक्त शिवार' योजनेच्या ६ लाख ३२ हजार ८९६ कामांद्वारे २७ लाख ८ हजार २७९ टीएमसी जलसाठा क्षमता निर्माण होऊन ३९ लाख ४ हजार ३९४ हेक्टर सिंचन क्षमतेचा भूभाग निर्माण झाला. याद्वारे २९ हजार ५४४ गावांना पाणी पुरवठा करण्याचे लक्ष पूर्ण झाले. लक्षणीय यशानंतर पुन्हा ३ जानेवारी २०२३ पासून राज्यात 'जलशिवार योजना' (२.०) सुरू करण्यात आली.

प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतास पाण्याची उपलब्धता निर्माण करणे आणि पाण्याची कार्यक्षमता वाढवून पाण्याच्या प्रत्येक थेंबातून जास्तीत जास्त पीक उत्पादन मिळविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने वर्ष २०१५-१६ पासून 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना' सुरू केली. राज्याच्या ३४ जिल्ह्यांमध्ये केंद्र व राज्याच्या ६०:४० हिश्श्याच्या अर्थसाहाय्याद्वारे ही योजना सुरू आहे.

माजी पंतप्रधान दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांच्या ९५ व्या जन्मदिनी २५ डिसेंबर २०१९ रोजी केंद्र शासनाने महाराष्ट्रासह सहा राज्यांच्या ७८ जिल्ह्यांमधील कायम दुर्भिक्ष असणाऱ्या ८३५० ग्रामपंचायतींसाठी 'अटल भूजल योजना' सुरू केली. जागतिक बँकेच्या सहकार्यातून केंद्र शासनाने या योजनेसाठी ६००० कोटी रुपयांस मंजुरी दिली होती. लोकसहभागातून या योजनेत अंतर्भूत सर्व ७८ जिल्ह्यांमधील ८३५० ग्रामपंचायतींचा भूजल आराखडाही संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

'जल जीवन मिशन' या केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाच्या योजनेमुळेही ग्रामीण महाराष्ट्रातील प्रत्येक ग्रामीण घराला सुरक्षित, शुद्ध आणि पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी नळजोडणीद्वारे नियमितपणे उपलब्ध करून देण्याचा उद्देश यशस्वी होताना दिसत आहे. १५ ऑगस्ट २०१९ रोजी सुरू झालेल्या या योजनेनुसार राज्यात प्रत्येक जिल्ह्यांमध्ये 'जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन' सुरू करण्यात आले. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा तसेच अन्य विभागांच्या समन्वयाने व जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनच्या मान्यतेने जल जीवन मिशनचे जिल्हास्तरीय आराखडे तयार करण्यात येतात.

या सर्व प्रयत्नांतून राज्यातील दुष्काळी परिस्थिती सुधारत असल्याचे चित्र आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या भूजल दुष्काळ निर्देशांकात ते प्रकर्षाने दिसते. त्याविषयी जाणून घेवूया.

**अशी होते भूजल पातळी जाहीर**

राज्याच्या महसूल व वनविभागाचा ७ ऑक्टोबर २०१७ चा शासन निर्णय आणि केंद्र शासनाची दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ च्या अनुषंगाने राज्यात दुष्काळ जाहीर करण्याचे निकष व कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. यानुसार राज्यातील परिस्थितीवर देखरेख ठेवण्यासाठी प्रामुख्याने वनस्पती निर्देशांक, मृद आर्द्रता निर्देशांक, जलविषयक निर्देशांक व पिकांचे क्षेत्रीय सर्वेक्षण, सत्यापन विचारात घेण्यात येतात.

यातील जलविषयक निर्देशांक हा राज्याच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत कार्यरत व पुणे स्थित भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (जीएसडीए) द्वारे तयार करण्यात येतो. ग्रामीण भागात पिण्याचे पाणी, शेती आणि औद्योगिक गरजांसाठी भूजलाचे सर्वेक्षण, संशोधन, नियोजन आणि विकास करणारी ही यंत्रणा तालुका निहाय भूजल दुष्काळ निर्देशांक तयार करून या निर्देशांकाचे मूल्य व त्यानुसार भूजल तुटीची वर्गवारी दर तीन महिन्याने जाहीर करते.

राज्यात एकूण ३९२० निरीक्षण विहिरी स्थिर भूजल पातळीच्या मोजणीसाठी स्थापित करण्यात



आल्या आहेत. त्यापैकी ऑक्टोबर २०२५ मध्ये ३६६५ निरीक्षण विहिरींची माहिती संकलित करण्यात आली असून त्यानुसार वर्ष २०२५ चा भूजल पातळी निर्देशांक काढण्यात आला आहे. यात राज्यातील ३३ जिल्ह्यांतील ३५२ तालुक्यांमध्ये भूजल पातळी ०.१५.च्या आत असून भूजल तुटीची वर्गवारी सामान्य असून अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा तालुक्यात हा निर्देशांक ०.१६ ते ०.३० दरम्यान असल्याने भूजल तुटीची वर्गवारी सौम्य वर्गात समाविष्ट आहे. ०.६० पर्यंत एकूण पाच स्तरांमध्ये भूजल पातळी निर्देशांकानुसार सामान्य, सौम्य, मध्यम, गंभीर आणि अती गंभीर अशी भूजल तुटीची वर्गवारी काढण्यात येते.

**भूजल स्तरात १.५२ मीटरने वाढ**

मागील दहा वर्षांच्या तुलनेत भूजल स्तर १.५२ मिटरने वाढला असून राज्याच्या दृष्टीने ही महत्वाची उपलब्धी आहे. मागील काही वर्षांच्या तुलनेत राज्यातील कोणताच तालुका मध्यम, गंभीर आणि अती गंभीर भूजल तुटीच्या वर्गात नसल्याने हे सकारात्मक चित्र आहे. भूजल पातळी निर्देशांकानुसार भूजलाच्या दृष्टीने नेहमीच संवेदनशील समजल्या जाणाऱ्या विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात सकारात्मक बदल घडल्याचे दिसून येते. अकोला, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, जालना, बीड, धाराशिव, लातूर आणि परभणी जिल्ह्यांमधील सर्वच तालुके सामान्य भूजल तुटीच्या श्रेणीत आहेत. त्याच प्रमाणे पश्चिम महाराष्ट्रामध्येही भूजल तूट स्थिर असून पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, नाशिक, अहिल्यानगर जिल्ह्यांमधील तालुक्यांचा यात समावेश आहे.

भुगर्भातील जल हे शाश्वत आहे. शेती, पिण्यासाठी, पर्यावरण आणि उद्योगासाठी आपणास ते वर्तमानकाळात टिकवून भविष्यासाठीही राखून ठेवायचे आहे. त्यासाठी खात्रीपूर्वक व संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने सुरू झालेली 'जलयुक्त शिवार योजना' आणि राज्यातील दुष्काळ कायमचा नष्ट करण्यासाठी 'नदी जोड प्रकल्प' राबविण्याच्या कामालाही गती प्राप्त झाली आहे. त्याचा परिणाम होऊन झालेले बदल भूजल पातळी निर्देशांकातील आकड्यांद्वारे अधिक स्पष्ट झाले आहेत. या योजनांसह केंद्र शासनाच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून राज्याला दुष्काळ मुक्त करण्याच्या दिशेने राज्य मार्गक्रमण करीत आहे.

**– रितेश मो.भुयार,**
माहिती अधिकारी,
माहिती व जनसंपर्क
नागपूर.

# प्रत्येक गावात संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे लाभार्थी शोधण्यासाठी प्रशासनाने युद्ध पातळीवर प्रयत्न करावेत-सौ.पुनमताई पवार

आत्ताच एक्सप्रेस

**धर्माबाद–** तालुक्यातील प्रत्येक गावात बऱ्याच लाभार्थ्यांना शासकीय योजनेबद्दल माहिती नसते, त्यातल्या त्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजने संदर्भात बरेच लाभार्थी अद्यापही वंचित असून त्या पार्श्वभूमीवर गावाशी संलग्नित तलाठी ग्रामसेवक यांनी पात्र लाभार्थी शोधण्यासाठी आपल्या मंडळ परिक्षेत्रातील गावात युद्धपातळीवर कार्य करावेत असे आवाहन निराधार योजना समितीच्या अध्यक्षा सौ.पुनमताई पवार यांनी करत तहसीलदार श्रीमती सुरेखा स्वामी यांना तशा प्रकारचे तलाठी व ग्रामसेवकांना आदेशच काढण्याची विनंती केली.

दोन दिवसांपूर्वी नवनिर्वाचित निराधार योजना समितीची पहिलीच बैठक तहसील कार्यालयाच्या सभागृहात संपन्न झाली. अध्यक्षा सौ पुनमताई पवार व सदस्य पत्रकार संजय कदम, व्यंकटेश अबुलकोड, सूर्यकांत मुळे व दिगंबर आलूरोड यांचा तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी सत्कार केला. व सदरील योजने संदर्भात समितीच्या सदस्यांना लाभार्थ्यांचे अर्ज छाननी करण्यास कुठलीही अडचण येऊ नये याच्यासाठी अद्ययावत असे शासनाचे परिपत्रक सर्वांना अभ्यासासाठी दिले. राज्यात निराधार, अंध, अपंग, शारीरिक आजाराने रोगग्रस्त व्यक्ती व निराधार विधवा, परित्यक्ता,देवदासी या सर्व दुर्बल घटकांसाठी अर्थसहाय्य देण्याच्या हेतूने राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व वृद्ध व्यक्तींसाठी श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येतात. तसेच केंद्र पुरस्कृत दारिद्र्यरेषेखालील वृद्ध व्यक्ती करिता इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती योजना, विधवा महिलांसाठी इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व दिव्यांग व्यक्तीसाठी इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येतात. या परिकक्षेत बसलेल्या पात्र लाभार्थ्यांचे अर्जांची छाननी करून लाभार्थ्यांचे अर्ज पात्र करून त्यांना अर्थसहाय्य मिळवून देणे हे निराधार योजना समितीचे कार्य असते त्या पार्श्वभूमीवर काल पहिली बैठक पार पडली.



यावेळी तहसीलदार सुरेखा स्वामी, नायब तहसीलदार जाकापुरे, संबंधित विभागाचे नव्यानेच रुजू झालेले कर्मचारी आंबेराव व संबंधित कामकाज ऑनलाइन करणारे ऑपरेटर अविनाश शेपुरे यांच्यासह भाजपाचे तालुकाध्यक्ष एडवोकेट चक्रेश पाटील तद्वतच दत्ताहरी पाटील आवरे उपस्थित होते.

काल लाभार्थ्यांचे बहुतांशी अर्ज समिती पुढे ठेवण्यात आले त्या अर्जाची छाननी समितीने केली त्यामध्ये संजय गांधी निराधार योजना अपंगांमध्ये ग्रामीण भागातील ३० तर शहरी भागातील सात अर्ज पात्र करण्यात आले. तत्तद्वतच श्रावण बाळ योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील १०तर शहरी भागातील १२अर्ज पात्र करण्यात आले. तद्वतच इंदिरा गांधी योजनेअंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक दहा-दहा अर्ज पात्र करण्यात येऊन पुढची बैठक लवकर लावण्याचे निराधार योजना समितीच्या अध्यक्षा सौ पूनम ताई पवार यांनी सांगितले. व कुठलेही अर्ज बाद किंवा अपात्र होणार नाहीत आणि ते झाले किंवा कोणत्या त्रुटीत आले किंवा कोणाचे मानधन बंद झाले हे व का बंद झाले हे लाभार्थ्यांना घरपोच कळवणे गरजेचे असून तसे लेखी स्वरूपात कळवून पुन्हा ते पात्र कसे होतील याबद्दल मार्गदर्शन करण्याबद्दल ही सूचना दिल्या.

# मेरा युवा भारततर्फे 'माय भारत बजेट क्वेस्ट २०२६'चे आयोजन

आत्ताच एक्सप्रेस

**हिंगोली –** मेरा युवा भारत, युवा कार्यक्रम विभाग, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, हिंगोली कार्यालयाच्या वतीने युवकांमध्ये केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत जागरूकता व समज विकसित करण्याच्या उद्देशाने 'माय भारत बजेट क्वेस्ट २०२६' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा उपक्रम क्विझ स्पर्धा नोंदणी मोहिमेचा एक भाग असून तो बहुस्तरीय व सहभागी स्वरूपात राबविण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन प्रश्नमंजुषा (क्विझ) आयोजित करण्यात येणार असून ही स्पर्धा दि. ०३ ते १७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत होणार आहे. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या युवकांनी माय भारत पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रश्नमंजुषा (क्विझ) टप्प्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सहभागींची राज्य व केंद्रशासित प्रदेश स्तरावर निबंध लेखन टप्प्यासाठी निवड करण्यात येणार असून, या टप्प्यात सहभागी युवकांना केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ च्या प्रमुख विषयांवर आपले विचार मांडण्याची संधी मिळणार आहे. कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यात राज्य व केंद्रशासित प्रदेश स्तरावर निवडलेल्या युवकांना केंद्रीय अर्थसंकल्पावर धोरणकर्ते व मान्यवरांशी आभासी संवाद साधण्याची संधी देण्यात येणार आहे. यामुळे युवकांमध्ये धोरण प्रक्रियेबाबतची समज, जागरूकता व सहभाग अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे. 'माय भारत बजेट क्वेस्ट २०२६' हा युवकांना केंद्रीय अर्थसंकल्पाशी जोडणारा एक अर्थपूर्ण उपक्रम असून, या माध्यमातून युवकांना धोरणनिर्मितीची प्रक्रिया समजून घेण्याची व त्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्याची संधी मिळणार आहे. जिल्ह्यातील सर्व युवकांनी दि. ०३ ते १७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत माय भारत पोर्टलवर नोंदणी करून मोठ्या संख्येने या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी, मेरा युवा भारत, हिंगोली यांनी केले आहे.

# नैसर्गिक शेतीमुळे मातीचे आरोग्य व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते-प्रा. भौमिक मकवाणा

आत्ताच एक्सप्रेस

परभणी – नैसर्गिक शेतीमुळे मातीचे आरोग्य सुधारते, पर्यावरणीय समतोल राखला जातो तसेच शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीस मदत होते, अशी माहिती अमरेली (गुजरात) येथील नैसर्गिक शेती महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक प्रा. भौमिक मकवाणा यांनी दिली.

येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील सेंद्रीय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र आणी शेकरू फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'नैसर्गिक शेतीची संकल्पना' या विषयावर मंगळवारी (दि. २७) ऑनलाईन मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रा. भौमिक मकवाणा यांनी नैसर्गिक शेतीची मूलभूत संकल्पना, तत्त्वज्ञान, जैवविविधतेचे महत्त्व आणि शाश्वत शेती पद्धती याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी रासायनिक निविष्ठांवरील अवलंबित्व कमी करून स्थानिक व नैसर्गिक स्रोतांच्या आधारे उत्पादन खर्चात घट कशी करता येईल, याची माहिती दिली.

या कार्यक्रमात नैसर्गिक शेतीसाठी बीजामृत, जीवामृत/घनजीवामृत, मिश्र पीक पद्धती, आच्छादन आणि वाफसा यांचे महत्त्व विशद करण्यात आले. तसेच देशातील विविध अग्रणी व्यक्तींच्या नैसर्गिक शेती क्षेत्रातील कार्याचा आढावा घेण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांसाठी उपयुक्त जैविक निविष्ठांची निर्मिती, त्यांचा योग्य वापर, मातीची सुपीकता वाढविण्याचे उपाय आणि कमी खर्चात शाश्वत उत्पादन घेण्याच्या पद्धतींबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. या ऑनलाईन कार्यक्रमास विद्यापीठातील प्राध्यापक, शास्त्रज्ञ, संशोधक, विद्यार्थी तसेच विविध भागांतील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमात प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून संवाद साधून त्यांच्या शंका व समस्यांचे निरसन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. आनंद गोरे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. मीनाक्षी पाटील यांनी केले. या उपक्रमामुळे नैसर्गिक शेतीविषयी जनजागृती वाढून शाश्वत व पर्यावरणपूरक शेतीकडे वाटचाल करण्यास निश्र्चितच चालना मिळेल.

# शासकीय वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनांच्या प्रवेश अर्जास १६ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

आत्ताच एक्सप्रेस

**हिंगोली –** सन २०२५-२६ करिता राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना तसेच पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांअंतर्गत प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज करण्याच्या कालावधीत वाढ करण्याची विद्यार्थ्यांकडून मागणी प्राप्त झाली होती. तसेच वसतिगृह प्रवेशासाठी अपेक्षित अर्ज प्राप्त न झाल्याने व अर्ज करताना विविध अडचणी उद्भवल्याने, बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकास दि. १५ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

त्यानुसार, शासकीय वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनांतर्गत प्रवेशासाठी अर्ज करण्याचा कालावधी दि. ६ ते दि. १५ फेब्रुवारी, २०२६ असा वाढविण्यात आला आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनांचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे शपथपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

विद्यार्थी भाड्याने राहत असून स्थानिक रहिवासी नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र, शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतल्याबाबतचे शपथपत्र/प्रतिज्ञापत्र, विद्यार्थी आई-वडिलांसोबत राहत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र, शिक्षण घेत असताना कोणतीही नोकरी किंवा व्यवसाय करणार नाही याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

शासकीय वसतिगृहासाठी पात्र असूनही गुणवत्तेनुसार व वसतिगृहाच्या क्षमतेअभावी प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनांसाठी विचारात घेण्यात येणार आहेत.

त्यामुळे शासनाने दिलेल्या विहित कालावधीत दि. ६ ते १५ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत हिंगोली जिल्ह्यातील सर्व इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनांतर्गत प्रवेशासाठी अर्ज करावेत, असे आवाहन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, हिंगोली यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# टाटा सॉल्टतर्फे हर नारंगी पॅक टाटा नमक नही होता हा ठाम संदेश

आत्ताच एक्सप्रेस

**छत्रपती संभाजीनगर –** भारतातील आयोडाइज्ड मीठ विभागात १९८३ पासून अग्रणी आणि बाजारातील आघाडीचा ब्रँड असलेल्या टाटा सॉल्टतर्फे हर नारंगी पॅक टाटा नमक नही होता हा ठाम संदेश देत, बनावट मीठ पॅकविरोधात लढ्याचे नेतृत्व करण्यात येत आहे. विशेषतः उत्तर प्रदेशमध्ये मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असलेल्या असंघटित मीठ बाजारपेठेत आणि बनावट मीठ पॅकच्या वाढत्या प्रमाणाच्या पार्श्वभूमीवर शुद्धता व विश्वासाचे नवे मापदंड प्रस्थापित करत, ही जाहीर घोषणा टाटा सॉल्टच्या उत्कृष्ट दर्जाचे मीठ पुरवण्याच्या ठाम वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

हर नारंगी पॅक टाटा नमक नही होता या घोषणेचा उद्देश प्रत्येक केशरी रंगाचा पॅक टाटा सॉल्टचाच नसतो, याबाबत जनजागृती करण्याचा आहे. या मोहिमेद्वारे दिसायला सारख्या पण बनावट मीठ पॅकबाबत ग्राहकांचे प्रबोधन केले जाणार आहे. भेसळमुक्त, उच्च दर्जाच्या मिठाची हमी देणारा योग्य केशरी रंगाचा पॅक निवडण्याचा हा संदेश आहे. उत्तर प्रदेशमधील असंघटित मीठ बाजारपेठेतील आव्हानांनंतरही टाटा सॉल्ट ब्रँड हा कुटुंबांच्या आरोग्य व कल्याणासाठी विश्वासार्ह पर्याय आहे. आयोडाइज्ड, भेसळमुक्त मिठाच्या प्रत्येक पॅकद्वारे भारताच्या पोषणविषयक उद्दिष्टांमध्ये योगदान देत, त्याचे पोषणमूल्य अधोरेखित केले जाते.





जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी शनिवार दि. ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. परभणी तालुक्यातील मतदान केंद्रांवर मतदानाचे साहित्य घेऊन कर्मचारी रवाना होत आहेत. निवडणूक पारदर्शक व सुलभ पध्दतीने पार पाडण्यासाठी परभणी तालुक्याचे निवडणूक निर्णय अधिकारी उदयसिंह भोसले यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी मार्गदर्शन केले.

# ५० वर्षे, एक राष्ट्र, असंख्य मॅगी 'एकत्रितपणाचे क्षण' आता अधिकृतपणे प्रमाणित

आत्ताच एक्सप्रेस

**मुंबई –** नेस्ले इंडिया भारतातील मॅगीच्या ५० वर्षांचा उत्सव साजरा करताना एक स्मरणीय पोस्टल स्टँप लॉन्च करताना आनंदित आहे. हा स्टँप श्री मनीष तिवारी, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, नेस्ले इंडिया, आणि श्री चिराग पासवान, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री, भारत सरकार यांच्या हस्ते अनावरण करण्यात आला. हा स्टँप मॅगीच्या उत्क्रांतीला, नेहमीच नवकल्पनांसोबत पुढे राहण्याला आणि एका खूपच आवडत्या श्रेणीशी जोडलेल्या अनुभवांना सन्मान देतो तसेच पिढ्यांमधून लोकांना एकत्र आणत राहतो, एकमेकांसोबत एकत्रित क्षण साजरे करत राहतो.

गेल्या पाच दशकांमध्ये, मॅगी भारतीय घरांमध्ये अनेक स्वादिष्ट रूपांमध्ये पोहोचले आहे नूडल्स आणि मसालेपासून सॉस, सूप आणि रेडी-टू-कुक आवडत्या पदार्थांपर्यंत. जलद एकट्या जेवणापासून ते संपूर्ण कुटुंब एकत्र आणणाऱ्या जेवणांपर्यंत, आणि हॉस्टेलच्या स्वयंपाकघरांपासून ते मोठ्या जमावांपर्यंत, मॅगी देशभरातील असंख्य खाद्य क्षणांचा भाग राहिले आहे. ''५० वर्षांचे एकत्रितपण'' स्टँप या सामायिक अनुभवांना सन्मान देतो, आणि मॅगी भारतभरातील टेबल्सवर आणत असलेल्या उब, आराम आणि संबंधांचे चित्रण करतो.

श्री चिराग पासवान, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री, भारत सरकार यांनी सांगितले, ''भारताचा प्रक्रिया केलेल्या अन्न क्षेत्राने दशकांनंतर घरगुती विश्वास मिळवण्यात मोठी प्रगती केली आहे. पायनियर ब्रँड्सने नवीन श्रेण्या निर्माण केल्या आणि आमच्या अन्न परिसंस्थेला बळकटी दिली आहे. या अद्भुत प्रवासाचा भाग म्हणून मॅगीला ५० वर्षे पूर्ण केल्याबद्दल मी अभिनंदन करतो.''

स्टँपच्या लॉन्चची घोषणा करताना, श्री मनीष तिवारी, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, नेस्ले इंडिया यांनी सांगितले, ''भारतामध्ये मॅगीसाठी हा खरोखरच खास टप्पा आहे. आमच्या देशासारख्या रंगीबेरंगी आणि वैविध्यपूर्ण देशात पाच दशक पूर्ण करणे हे ब्रँडवर लाखो लोकांनी दिलेल्या विश्वास, प्रेम आणि रोजच्या काळजीचे प्रतीक आहे. हे सामायिक क्षणांनी, बदलत्या चवींनी आणि वर्षानुवर्षे, पिढ्यानुपिढ्या वाढत गेलेल्या बंधाने आकारलेल्या प्रवासाचा उत्सव आहे.''

नेस्ले इंडिया हे हे नाते अधिक दृढ करण्यासाठी आणि देशभरातील लोकांना आपुलकी, आराम व एकत्रपणाचे क्षण निर्माण करणाऱ्या दैनंदिन अनुभवांमध्ये योगदान देण्यासाठी वचनबद्ध आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीसाठी आज मतदान, मतदान प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज

## मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क अवश्य बजवावा-जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

आत्ताच एक्सप्रेस

**परभणी –** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीकरीता शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. मतदारांना सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या कालावधीत मतदान करता येणार आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदारांनी निर्भयपणे आपल्या मतदानाच अमूल्य हक्क बजवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.

परभणी जिल्हयात एकूण ग्रापंचायती ७०५ असून जिल्हा परिषदेच्या ५४ गट तर पंचायत समितीच्या १०८गणांसाठी ही निवडणूक होणार आहे. सेलू तालुक्यात जिल्हा परिषदेचे ५ गट तर पंचयात समितीचे १० गण आहेत. जिंतूर तालुक्यात १० गट, २० गण, मानवत तालुक्यात ४ गट , ८ गण, पाथरी तालुक्यात ५ गट, १० गण, सोनपेठ तालुक्यात ३ गट, ६ गण, परभणी तालुक्यात १० गट, २० गण, गंगाखेड तालुक्यात ७ गट, १४ गण, पालम तालुक्यात ४ गट, ८ गण, तर पूर्णा तालुक्यात ६ गट व १२ गणांसाठी मतदान पार पडणार आहे.

मतदान केंद्रांची संख्या १२७८ आहे. एकूण मतदारांची संख्या १० लाख ४५ हजार ८५५ आहे. यामध्ये पुरुष मतदार ५ लाख ४२ हजार ९३७, स्त्री मतदार ५ लाख २ हजार ९१३ तर तृत्तीयपंथीय मतदारांची संख्या ५ आहे.

मतदान प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज झाले आहे. मतदान केंद्रांवर मतदारांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. मतदानाच्या पार्श्वभुमीवर कडक सुरक्षा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

मतदानासाठी कामगारांना भरपगारी सुट्टी

परभणी, गंगाखेड, मानवत, पाथरी, पुर्णा, सेलु, जिंतुर, सोनपेठ, पालम या जिल्हा परिषद व पंचायत समिती मतदान क्षेत्रातील मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्य निवडणुक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी, असे शासनाने निर्देश दिले आहेत.

हे आदेश मतदारसंघातील सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहतील. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत कामगारांना मतदानासाठी सुट्टी देण्याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडावी तसेच मतदान केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर मोबाईल फोन वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. मतदारांनी आपले मोबाईल फोन मतदान केंद्रावर आणू नयेत.

मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा तसेच मतदान शांततेत पार पाडण्यासाठी परभणी तालुक्यातील वडगाव सुक्रे व टाकळी बोबडे, सेलू तालुक्यातील मौ. ढेंगळे पिंपळगाव, पाथरी तालुक्यातील पाथरगव्हाण बु आणि वाघाळा, गंगाखेड तालुक्यातील गंगाखेड शहर (जनावरांचा बाजार) मानवत तालुक्यातील केकरजवळा व गोगलगाव, पालम तालुक्यातील पालम शहर, सोनपेठ तालुक्यातील शेळगाव म. व शिर्शि बु., जिंतूर तालुक्यातील कावी व आडगाव (बा), पूर्णा तालुक्यातील कात्नेश्वर येथील आठवडी बाजार ७ फेब्रुवारी २०२६ रोजी बंद राहणार आहेत.

सोमवार, दि. ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे. तालुकानिहाय मतमोजणीचे केंद्र पुढीलप्रमाणे आहेत. सेलु तहसील कार्यालय, जिंतूर औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), मानवत तहसील कार्यालय, पाथरी – औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), सोनपेठ तहसील कार्यालय, परभणी – वसंतराव नाईक मराठवाडा कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय, गंगाखेड नवीन उपविभागीय अधिकारी कार्यालय, पालम तहसील कार्यालय, पूर्णा तहसील कार्यालय.

# नांदेड जिल्हा निर्यातीसाठी अग्रस्थानी नेणार-जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## शासनाच्या सुविधांचा लाभ घेऊन 'लोकल टू ग्लोबल'चा मार्ग स्वीकारण्याचे उद्योजकांना आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड –** नांदेड जिल्ह्यात उपलब्ध दळणवळणाच्या भक्कम पायाभूत सुविधा तसेच कृषीवर आधारित उत्पादन क्षमता पाहता निर्यातीसाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत. उद्योजकांनी बाजारपेठेचे भान ठेवून भविष्यातील धोके ओळखावेत व केंद्र तसेच राज्य शासनाच्या विविध विभागांशी समन्वय साधून जिल्ह्यात निर्यातीस पोषक वातावरण निर्माण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

निर्यात हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून शासनाच्या विविध सुविधा व योजनांचा लाभ घेऊन नांदेड जिल्ह्याला 'लोकल टू ग्लोबल' करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे आज ''महानिर्यात इग्नाईट कन्व्हेंशन २०२६'' अंतर्गत आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते झाले. या कार्यशाळेस जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे, डाक विभागाचे अधिकारी अक्षय कुलकर्णी, न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीचे चांगदेव शेळके, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अधिकारी पी. डी. मुळे, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी श्री. सोनकांबळे, ए.यू. स्मॉल फायनान्स बँकेचे व्यवस्थापक अमरजितसिंघ, भारतीय स्टेट बँकेचे अधिकारी सौरभ कुमार, नांदेड जिल्हा औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष हर्षद शहा, आनंद बिडवई, निर्यातदार निलेश देशमुख तसेच निर्यातक्षम उद्योगांचे उद्योजक, नवउद्योजक व विविध शासकीय विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

नांदेड जिल्ह्यात जिल्हा निर्यात केंद्राची निर्मिती करणे व निर्यातीबाबत उद्योजकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश असल्याचे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे यांनी प्रास्ताविकात नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'लोकल टू ग्लोबल' या संकल्पनेच्या पूर्ततेसाठी केंद्र शासनाच्या डाक विभागामार्फत उपलब्ध असलेल्या डाक घर निर्यात केंद्र, डाक पोर्टल नोंदणी तसेच सुलभ व आधुनिक निर्यात प्रक्रियेबाबत अधिकारी अक्षय कुलकर्णी यांनी पॉवर पॉईंट सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली.

उद्योग व व्यापार सुलभतेच्या दृष्टीने मैत्री कक्ष अंतर्गत उद्योगांच्या अडचणी एकाच छताखाली सोडविण्याची व्यवस्था असल्याचे अधिकारी धनश्री जाधव व मनोज डोमाणे यांनी ऑनलाईन मार्गदर्शनातून स्पष्ट केले. उद्योग सुरू करण्यासाठी कर्जविषयक अडचणी, शासकीय योजनांचा लाभ व उद्योजकांनी सकारात्मक मानसिकतेने पुढे येण्याची आवश्यकता बँक अधिकाऱ्यांनी अधोरेखित केली.




केळी उत्पादन घटकाच्या संशोधन व निर्यात अनुभवाबाबत माहिती देताना निर्यातदार निलेश देशमुख यांनी निर्यातीतील अडचणी, त्यावरील उपाय तसेच ग्राहकांना गुणवत्तापूर्ण माल पुरविण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यशाळेचे आभार प्रदर्शन व्यवस्थापक अनिल कदम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग निरीक्षक सतीशकुमार चव्हाण, अरविंद भांडे, सोमेश आठवले, एमसीईडी संस्थेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. या कार्यशाळेस सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटक, निर्यातदार, निर्यातक्षम व नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, शेतकरी सहकारी संस्था, प्रक्रिया उद्योग केंद्र, निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, संशोधक तसेच बँका व विविध शासकीय यंत्रणांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बनावट सही करुन ३ लक्ष सत्तेचाळीस हजार रु बनावट चेक वटवीणाऱ्या महेश्वर रघुनाथ मुंडे याचेवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करा

## निचपूरच्या ग्राम पंचायत अधिकाऱ्याने दिली पोलीसात तक्रार

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट –** तालुक्यातील ग्रा.प.निपचपुर चे चेक क्र. ०६४३४२ ची बनावट सहि करुन पैसे वटवुन उचलकरणाऱ्या निचपूर येथील महेश्वर रघुनाथ मुंढे यांच्यावर फसवणुक व लुबाडणुची कार्यवाही करण्यात यावी असे निवेदन निचपूर ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी संतोष धोपटे यांनी किनवट पोलीस स्टेशन व किनवट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना दिले आहे.

उपरोक्त विषयास अनुसरुण ग्रामपंचायत अधिकारी यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात पुढे असे नमुद केले आहे की निचपूर येथील महेश्वर रघुनाथ मुंडे हा स्वताःला पॅनल प्रमुख संबोधुन तीन लक्ष सत्तेचाळीस हाजाराचा चेक बुक ताब्यात घेऊन ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची बनावट सही मारुन चेक वटविणाऱ्यावर कार्यवाही व्हावी आशी विनंती सदर अर्जात केली आहे.

ग्रामपंचायत निचपुर ता. किनवट जि. नांदेड येथील ग्रामपंचायत चेकबुक गैरमार्गाने ताब्यात घेऊन व स्वतः ग्रा.प. पॅनल प्रमुख आहेचा बनाव भरुन व ग्रा.प.चा चेक ०६४३४२ दि.२१/०१/२०२६ रु.३,४७,०००/- तीन लाख सत्तेचाळीस हजार रु. चा चेक शिवाय कंस्ट्रक्शन च्या च्या नावे देऊ केला आहे. व या चेकवर माझी सही नसल्याचे ग्रामपंचायत अधिकारी संतोष धोपटे यांनी अर्जात नमूद केले आहे.

या बनावट व फसवणुकीने चेक देणाऱ्या महेश्वर रघुनाथ मुंढे याची चौकशी व कार्यवाही करून फसवणुकीचीचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी ग्राम पंचायत अधिकारी संतोष धोकटे यांनी निवेदनात केली आहे.

# धर्माबाद शहरात ३२ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कार्यवाही कार्यवाहीत १३ हजार ६०० रुपये दंड वसूल

**आत्ताच एक्सप्रेस**

**धर्माबाद –** धर्माबाद शहरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची मोठ्या प्रमाणात विक्री तसेच कोटपा २००३ कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत मिळालेल्या माहितीनुसार जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण पथकाने ५ फेब्रुवारी रोजी धर्माबाद शहरात विविध ठिकाणी अचानक धाडी टाकून एकूण ३२ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कार्यवाही केली. या कार्यवाही १३ हजार ६०० रुपये दंड वसूल केला.

ही कार्यवाही जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पांडुरंग पावडे व नोडल अधिकारी डॉ. हनमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात जिल्हा सल्लागार डॉ. शितल चातुरे, डॉ.संजीवनी जाधव, डेंटल सर्जन डॉ. म्याकलवर, मानसशास्त्रज्ञ प्रकाश आहेर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते बालाजी गायकवाड, एमजीवीएसचे मंगेश गायकवाड, समुपदेशक नितीन आडे व दंत सहायक रमेश जक्कावाड तसेच धर्माबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल एफ.ए.सय्यद व ए.एस. कदम उपस्थित होते.

सार्वजनिक ठिकाणी तसेच शैक्षणिक अथवा शासकीय, निमशासकीय कार्यालयाच्या परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची विक्री अथवा सेवन किंवा साठवण होत असल्यास जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय नांदेड येथे तक्रार नोंदवून नांदेड जिल्हा तंबाखू मुक्त करण्याच्या या अभियानास सहकार्य करावे असे, आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी केले आहे.

# पेंदा येथील चिमुकल्यांनी जिंकले गावकऱ्यांचे मन

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट –** दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी साडेसहा वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पेंदा येथे विद्यार्थ्यांचा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला गावकऱ्यांची मोठी उपस्थिती लाभली असून, चिमुकल्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शिवाजी भताने होते. प्रमुख अतिथी म्हणून ॲड. व्ही. एस. कानिदे, ॲड. सूर्यवंशी (दिवाणी न्यायालय, किनवट) तसेच शेख महंमद रफी (अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती, पेंदा) उपस्थित होते. यावेळी से. नि. शिक्षक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश मुंडे, पोलीस पाटील मारुती सिरसलवार, ज्येष्ठ नागरिक महबूब मामा, ग्रामपंचायत सदस्या सिरसलवार ताई, मुनेश्वर ताई, विजय मुनेश्वर, डोईफोडे सर, शिवा केंद्रे सर, तिडके सर, भूषण भरणे (सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती), शिवराज विलास मुंडे (कोपरा), भोंबे सर (शिवाजी महाराज विद्यालय, कोपरा) व रमेश भरणे आदी मान्यवर उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शेतकरी नृत्य, आदिवासी नृत्य, नाटिका, उखाणे तसेच व्यसनमुक्तीपर संदेश देणारी नाटिका अशा विविध सादरीकरणांतून सामाजिक जाणिवा आणि संस्कृतीचे दर्शन घडवले. प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षकांकडून टाळ्यांचा कडकडाट मिळाला.

विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनार्थ गावकऱ्यांच्या वतीने एकूण ₹७,००० (सात हजार रुपये) बक्षीस स्वरूपात देणगी देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. डी. जी. क्षीरसागर सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन इंदूरवार सर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अशोक मामा बोइंवाड यांनी विशेष सहकार्य केले.

शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. चिमुकल्यांच्या कलागुणांना मिळालेल्या दादीनं पेंदा गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

# पहाटेचा थरार! किनवटजवळ भीषण अपघातात डॉक्टर बहीण-भाऊ व चालक गंभीर जखमी


**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट (जि. नांदेड)–** चंद्रपूर ते किनवट या प्रवासादरम्यान आज पहाटे सुमारे पाच वाजता किनवटपासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर असलेल्या घोटी येथे झालेल्या भीषण अपघातात डॉक्टर बहीण-भाऊ व वाहनचालक असे तिघे जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर सध्या नागपूर येथे अतिदक्षता उपचार सुरू आहेत.

या अपघातात गोकुंदा येथील रहिवासी ज्येष्ठ नेते नारायण सिडाम यांचे नातवंड असलेले व माजी सैनिक अशोक आबाराव सिडाम यांची कन्या रत्नमाला अशोक सिडाम, त्यांचा मुलगा कुणाल अशोक सिडाम (दोघेही डॉक्टर) तसेच वाहनचालक अजय लदाडे हे तिघे जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, डॉक्टर कुणाल सिडाम यांच्या साखरपुड्याच्या कार्यक्रमासाठी कुटुंबीय गडचिरोली येथे गेले होते. कार्यक्रम आटोपून चंद्रपूर मार्गे किनवटकडे परतीचा प्रवास सुरू असताना ही दुर्दैवी घटना घडली.

घोटी परिसरात वाहनचालकाचे गाडीवरील नियंत्रण अचानक सुटल्याने कार रस्त्याबाहेर जाऊन जोरात आदळली. धडकेचा वेग इतका प्रचंड होता की वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून तिघांनाही गंभीर दुखापती झाल्या. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी तातडीने मदतकार्य करत जखमींना उपचारासाठी प्रथम आदिलाबाद येथे हलवले. मात्र तिघांचीही प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील विशेष उपचारासाठी त्यांना नागपूर येथे रेफर करण्यात आले.

या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून सिडाम कुटुंबावर अचानक ओढावलेल्या संकटाबद्दल सर्वत्र चिंता व्यक्त होत आहे. दरम्यान, अपघाताची नोंद घेऊन संबंधित यंत्रणांकडून पुढील तपास व चौकशी सुरू असल्याची माहिती आहे.



# किनवट तालुकास्तरीय स्पर्धेत जि.प. प्रा. शा. गोंडखेडीच्या विद्यार्थिनीचे यश

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट –** तालुकास्तरीय शैक्षणिक उपक्रमांतर्गत आयोजित पाढे पाठांतर स्पर्धेत जि.प. प्राथमिक शाळा, गोंडखेडी येथील विद्यार्थिनी कु. आमृता नानंगसिंग साबळे हिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कु. आमृता हिने १ ते ४१ पर्यंतचे पाढे अचूकपणे पाठांतर करून उत्कृष्ट कामगिरी केली.



या यशामागे शाळेचे मुख्याध्यापक श्री सुधाकर दहिफळे व सहशिक्षक सतिश नालमवार यांनी विद्यार्थ्यांकडून दररोज पाढ्यांचा सराव करून घेतल्यामुळे विद्यार्थिनीला हे यश मिळवता आले. तसेच किनवट तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने साहेब तसेच धानोरा बिटचे शिक्षण विस्तार अधिकारी , केंद्रप्रमुख आणि केंद्रिय मु .अ .यांच्या मार्गदर्शनाचा मोलाचा वाटा आहे.

विद्यार्थिनीच्या या यशाबद्दल गट शिक्षणाधिकारी श्री अनिलकुमार महामुने साहेब यांच्या हस्ते तिला तालुकास्तरीय स्पर्धेत प्रशस्तिपत्रक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी दिग्रस (चंद्रपूर) ग्रामपंचायतीचे उपसरपंच कर्तार साबळे तसेच ग्रामसेवक अनिल शिंदे यांनीही कु. आमृता हिचे अभिनंदन करून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या यशामुळे जि.प. प्रा. शा. गोंडखेडी तसेच संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांनी केलेल्या प्रयत्नांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# सोमवारी आयटीआय पास उमेदवारांसाठी भरती मेळाव्याचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड –** मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्रद्वारा श्री गुरुगोबिंदसिघजी औद्योगिक संस्था, नांदेड यांच्यावतीने सोमवार ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वा. आयटीआय पास उमेदवारांसाठी शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत पीएमएनएएम भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तरी आयटीपास उमेदवारांनी या मेळाव्यास उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे प्राचार्य एस.व्ही. सुर्यवंशी व सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार पी.के.अन्नपुर्णे यांनी केले आहे.

या मेळाव्यासाठी पुढील व्यवसायाच्या प्रशिक्षणार्थ्यांची शिकाऊ उमदेवार म्हणून भरती करण्यात येणार आहे. मेकॅनिकल मोटर व्हेईकल, फिटर, टूल अँड डाय मेकर, पेंटर जनरल, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, इलेक्ट्रिशियन, मेकॅनिकल ट्रॅक्टर, वेल्डर, वेल्डर (जीएमएडब्ल्यू आणि जीटीएडब्ल्यू), शीट मेटल वर्कर आयसीटीएसएम, टर्नर , मशिनिस्ट ग्राइंडर ,वायरमन, मशिनिस्ट, फाउंड्रीमॅन इ. व्यवसायाचे उमेदवार भरती करण्यात येणार आहेत.

# 'भारत रंग महोत्सव २०२६' मुंबईत ९ ते १३ फेब्रुवारी या कालावधीत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** राष्ट्रीय नाट्य विद्यालय, भारत सरकार आणि सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारत रंग महोत्सव २०२६' या भव्य नाट्य महोत्सवाचे आयोजन दि. ९ ते १३ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी येथे करण्यात आले आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता होणार आहे. या नाट्य महोत्सवात देश-विदेशातील नामांकित नाट्यसंस्थांची पाच नाटके सादर करण्यात येणार आहेत. या सादरीकरणांद्वारे विविध भारतीय भाषांमधील नाट्य परंपरा, सर्जनशीलता आणि प्रयोगशीलतेचा संगम प्रेक्षकांना अनुभवता येईल. या सर्व नाटकांचे प्रयोग प्रेक्षकांसाठी विनामूल्य खुले असून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य याप्रमाणे बैठक व्यवस्था करण्यात आलेली आहे. नाट्यरसिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे. भारत रंग महोत्सवात दि. ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता रवींद्र नाट्य मंदिर येथे तमास (राष्ट्रीय नाट्य विद्यालय, नवी दिल्ली) या नाटकाचे सादरीकरण होईल. दि. १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता रवींद्र नाट्य मंदिर येथे बाबुजी-राष्ट्रीय नाट्य विद्यालय, नवी दिल्ली मार्फत हिंदी नाटकाचे सादरीकरण होईल.

दि. ११ फेब्रुवारी रोजी मिनी थिएटर येथे सायंकाळी ४:३० वाजता 'ब्रेस्ट ऑफ लक' या कॅन्सर विषयावर जनजागृती करणाऱ्या नाटकाचे सादरीकरण करण्यात येईल. तसेच याच दिवशी रवींद्र नाट्य मंदिर येथे सायंकाळी ६:३० वाजता थिव्हज् कार्निव्हल या नाटकाचे राष्ट्रीय नाट्य विद्यालयामार्फत सादरीकरण होईल. दि. १२ फेब्रुवारी रोजी रवींद्र नाट्य मंदिर येथे लाईफ ऑफ ड्रिम या स्पॅनिश भाषेत स्पेन येथील कलाकार आपली कला सादर करणार आहेत. या महोत्सवातील शेवटचे नाटक आधे अधुरे हे नाटक दि. १३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता सादर होणार आहे. रसिक प्रेक्षकांनी या नाट्यप्रयोगाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

# इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या पुरस्काराकरिता २१ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत देण्यात येणारे महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार आणि क्रांतिवीर राजे उमाजी नाईक या पुरस्कारांसाठी सन २०२५-२६ वर्षाकरिता इच्छुक व्यक्ती व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी व्यक्ती व संस्थांनी २१ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज करावे असे आवाहन सहसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय यांनी केले आहे. पुरस्कारासाठी अटी व शर्ती :- अर्जदार व्यक्ती, संस्था महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे. अर्जदाराने संबंधित समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अथवा अन्य क्षेत्रातील उत्थानासाठी सलग व उल्लेखनीय स्वरूपाचे कार्य केलेले असावे. अर्ज विहित नमुन्यात सादर करणे बंधनकारक असून शासन निर्णयात नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे, कार्याचा सविस्तर अहवाल, शिफारस पत्रे व प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अपूर्ण, चुकीची माहिती असलेले अथवा मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत. पुरस्काराबाबत अंतिम निर्णय शासन स्तरावर घेण्यात येईल व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813